रत्नागिरी
सिंधुदुर्ग
टाइम्स
कोकणचे सर्वाधिक खपाचे दैनिक
शनिवार, दि. ११ ऑक्टोबर २०१४

# हळबे महाविद्यालयातर्फे दोडामार्ग शहरात स्वच्छता मोहीम उत्साहात

दोडामार्ग, १० ऑक्टोबर (वार्ताहर) - दोडामार्ग येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व ग्रामपंचायत दोडामार्ग यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील प्रमुख रस्त्यांवर स्वच्छता मोहीम मोठ्या उत्साहात राबविण्यात आली. दोडामार्ग येथील बाजारपेठ, भेडशी रोड, गोवा रोड, सावंतवाडी रोड व आई रोड या प्रमुख मार्गावर स्वच्छता अभियान राबविण्यात आले. अभियानासाठी ग्रामपंचायत, शासकीय अधिकारी यांनी सहकार्य करुन विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. या कार्यक्रमाची सुरुवात महात्मा गांधी यांच्या प्रतिमेला ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक भाई परमेकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन करण्यात आली. त्यानंतर गांधीजीचे 'ईश्वर जन तो' हे आवडते भजन सामुदायिकरित्या करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी स्वच्छता अभियानासंदर्भात शपथ घेवून स्वच्छतेविषयी संदेश देणाऱ्या पथनाट्याचे सादरीकरण पिंपळेश्वर चौकात केले. त्यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही.ए.पाटील यांनी स्वतः हाती झाडू घेवून स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ केला. यावेळी स्वातंत्र्य सैनिक तसेच नवनिर्माण शिक्षण संस्थेचे सदस्य सुर्यकांत परमेकर, स्थानिक नियामक समितीचे सदस्य विवेकानंद नाईक, सामाजिक कार्यकर्ते आनंद ताबूळकर, राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख प्रा. डॉ.एस.यु दरेकर, प्रा. रामकिसन मोरे, ग्रामपंचायत कर्मचारी आदि उपस्थित होते. ही स्वच्छता मोहिम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. 'स्वच्छ दोडामार्ग, सुंदर दोडामार्ग' हा उपक्रम महाविद्यालयाने राबविल्याबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.